# १०. सामाजिक सुरक्षा समिती

महिलांवर होणा-या अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्रातील **आयुक्तालये तसेच जिल्ह्याच्या ठिकाणी** सामाजिक सुरक्षा समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत, त्याची रचना खालीलप्रमाणे आहे :---

- पोलीस आयुक्त किंवा पोलीस अधीक्षक ... अध्यक्ष
- पोलीस उप अधीक्षक/पोलीस निरीक्षक (नागरी हक्क संरक्षण) ... सदस्य चिटणीस
- महिला सामाजिक कार्यकर्त्या (दोन ते पाच पर्यंत) ... सभासद
- पोलीस निरीक्षक / पोलीस उप निरीक्षक किंवा सहाय्यक पोलीस आयुक्त (स्थानिक गुन्हे शाखा) ... सभासद

या समितीमध्ये महिलांवर होणा-या अत्याचारांबाबत महिन्यांतून एक वेळा आढावा घेण्यात येतो. महिलांना त्यांच्यावर होणा-या अत्याचाराचे निवारण करण्यासाठी कायद्यातील तरतुदींची जाणीव करून देण्यात येते. तसेच संवेदनशील प्रकरणांवर चर्चा करून उपाययोजना करण्यात येतात.

तसेच **तालुका पातळीवर** मंडळ पोलीस निरीक्षक यांच्या अधिपत्याखाली सामाजिक सुरक्षा समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये एक महिला पोलीस हवालदार व दोन महिला सामाजिक कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

त्याचप्रमाणे **प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये** महिला सुरक्षा समिती स्थापन करण्यात आली असून त्याची रचना खालीलप्रमाणे आहे :---

- पोलीस ठाण्याचे उप निरीक्षक/ सहाय्यक पोलीस निरीक्षक ... प्रमुख
- ५ महिला कार्यकर्त्या ... सदस्य

या कार्यकर्त्या क्रियाशील व विश्वासार्हता प्राप्त झालेल्या, बिगर राजकीय, महिलांच्या कल्याणासाठी कार्य करणा-या असाव्यात अशा सूचना आहेत.

## पोलीस व नागरिकांमध्ये सुसंवाद साधण्यासाठी योजना

पोलीस व नागरिक यांच्यात सुसंवाद निर्माण होण्यासाठी नागरिकांचे पोलीसांविषयी व पोलीस दलाविषयी असलेले गैरसमज दूर होऊन पोलीस खात्याविषयी जनतेमध्ये विश्वास निर्माण होण्याच्या दृष्टीने, तक्रारदारांनी पोलीसांकडे तक्रार केल्यानंतर, कमीत कमी एक आठवडयानंतर तक्रारदाराला त्याच तक्रारीबाबत चौकशी व चर्चा करावयाची असल्यास, पोलीस ठाण्याचे ज्येष्ठ पोलीस निरीक्षक प्रत्येक शनिवारी संध्याकाळी ५-०० ते ८-०० या वेळात जनतेने केलेल्या तक्रारीबाबत जनतेच्या सर्व प्रश्नांना कायद्यातील तरतुदीनुसार उत्तरे देण्यासाठी उपलब्ध असतील व त्यांच्या प्रकरणाची सद्य:स्थिती अवगत करतील.

## महाराष्ट्र राज्यामध्ये महिलांवर होणा-या अत्याचारांना आळा घालण्याच्या संदर्भात कृती दलाची (टास्कफोर्स) स्थापना.

महिलांवर होणाऱ्या अत्याचाराबाबतचे बहुतांशी गुन्हे हे हुंडाबळी व महिलांचा छळ या प्रकाराचे आहेत. या गुन्हयांना आळा घालण्यासाठी ' कृती दलाची ' स्थापना करण्यात आली आहे. सदर कृती दलाची रचना खालीलप्रमाणे राहील :---

(१) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई. ... अध्यक्ष

(२) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई. ... सदस्य

(३) सचिव (अपील व सुरक्षा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई. ... सदस्य

(४) सचिव, गृह विभाग (विशेष), मंत्रालय, मुंबई ... सदस्य

(५) सचिव, महिला व बालकल्याण विभाग, मंत्राल्य, मुंबई. ... सदस्य

(६) अध्यक्षा राज्य महिला आयोग. ... सदस्य

(७) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई ... सदस्य

(८) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई ... सदस्य

(९) संचालक, सरकारी अभियोग, मुंबई ... सदस्य

(१०) पोलीस उप महानिरीक्षक
(महिला अत्याचार प्रतिबंधक कक्ष) ... सदस्य
महाराष्ट्र राज्य, मुंबई

(११) संचालक, महिला व बाल कल्याण, पुणे ... सदस्य

(१२) उप सचिव (कार्यासन पोल-१३), गृह विभाग, सदस्य-सचिव
मंत्रालय, मुंबई.

या समितीद्वारे धोरणात्मक विषयावर विचारविनिमय करून निर्णय घेण्यात येतो.

## शांतता समिती

प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी जातीय सलोखा निर्माण करण्यासाठी व सुसंवाद निर्माण करण्यासाठी 'शांतता समिती' स्थापन करण्यात आली आहे. या समितीत सर्व जाती-जमातीच्या व धर्माच्या सदस्यांचा समावेश असतो. या समितीचे अध्यक्ष पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक हे असतात. अशा प्रकारच्या शांतता समितीची प्रत्येक पोलीस ठाण्याच्या ठिकाणी स्थापना करण्यात आली आहे.

## मोहल्ला समिती

प्रत्येक पोलीस ठाण्यात सर्व जाती-जमातीच्या लोकांमध्ये सुसंवाद व जातीय सलोखा राखण्यासाठी 'मोहल्ला समितीची' स्थापना करण्यात आली आहे. स्थानिक परिसरात शांतता व जातीय सलोखा राखण्यासाठी प्रत्येक सणाच्या अगोदर मोहल्ला समितीची बैठक घेतली जाते.

अशा प्रकारे प्रत्येक बीट अधिकाऱ्याने मोहल्ला समितीची बैठक महिन्यातून एकदा घ्यावी. तसेच संबंधित पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी ही बैठक किमान तीन महिन्यातून एकदा घ्यावी व बैठकीस सहाय्यक पोलीस आयुक्त/उपआयुक्त हेही उपस्थित राहतील.